
दि. 05/04/2023

पुढारी पृ. पान क्र. 1

# कांदळवनांची कत्तल करून माती भराव

## काशिमिरात पाच जणांवर गुन्हा दाखल




**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे चेना येथील सीआरझेड व कांदळवन असलेल्या तिवरांच्या झाडाची कत्तल करून त्या जागेवर मोठ्या प्रमाणात माती भराव करण्यात येत आहे. अनधिकृत माती भराव व तिवरांच्या झाडाचा ऱ्हास केल्याप्रकरणी जागेचा मालक, विकासक, डंपर चालक-मालक व सुपरवाझर या पाच जणांवर काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर शहरात गेल्या काही महिन्यापासून तिवरांच्या झाडांची कत्तल करून माती भराव केला जात असल्याचे दिसून येते. काही दिवसांपूर्वी भाईंदर पश्चिमेला याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. परंतु महसूल विभाग व पोलीस यांच्याकडून कठोर कारवाई होत नसल्यामुळे हे गुन्हे कमी होताना दिसत नाही. असाच प्रकार

मौजे चेना स.नं. १२ हिस्सा न. २ याचे जमिन मालक बेबी सुकुर पाणेरा व इतर आणि स.नं. १३ हिस्सा क्रं. २(१) जमीन मालक हावलुबाई रमण शेलार व इतर यांच्या नावे असलेल्या जमिनीवर कांदळवन पसरले आहे. या परिसरातील तिवरांच्या झाडांची कत्तल करून तेथे मोठ्या प्रमाणात माती भराव केला जात आहे. या ठिकाणी अनेक दिवसांपासून माती भराव होत असताना महसूल विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे. अनेकांनी तक्रारी केल्यानंतर त्या जागेवर सुरू असलेली कांदळवनांची कत्तल व माती भरावाची पाहणी करण्यासाठी ३१ मार्च रोजी नायब तहसीलदार स्मिता गुरव, तलाठी नितीन पिंगळे, अभिजित बोडके हे गेले. त्यावेळी त्या जागेवर एक डंपर विना परवाना माती आणून तेथे माती भराव करून कांदळवनाचा ऱ्हास करत असल्याचे दिसून आले. माती भराव करण्यासाठी माती घेऊन आलेले वाहन चालक संदिप जिजाभाऊ काकडे यांनी चार ब्रासची मालजीपाडा येथील रॉयल्टी असताना त्यांनी या जागेत माती भराव करण्यासाठी अनधिकृत पणे माती घेऊन आले होते. डंपर माती खाली करत असताना महसूल विभागाने पकडले. त्यानंतर सुपरवायझर मोहन, विकासक शिवम पाटील , वाहनाचे मालक संतोष जाधव आणि वाहन चालक संदिप काकडे व जमिन मालक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# काँग्रेस करणार निषेध

**वसई :** भाजपा मोदी सरकारच्या धर्म, जातीवादी, हुकूमशाही, भ्रष्टाचारी व्यवस्थेविरुद्ध वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते रस्त्यावर उतरून निषेध करतील आणि जनतेत सरकार विरुद्ध जनजागृती करतील, असा इशारा काँग्रेस भवन, पारनाका, वसई येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा पालघर लोकसभा निरीक्षक विजय पाटील यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेत, वसई विरार शहरातील स्थानिक मुद्दे देखील घेऊन जनतेत जावू आणि स्थानिक सत्ताधारी यांच्या भ्रष्ट आणि मनमानी कारभार जनतेसमोर आणू, असे पाटील यांनी सांगितले. तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची प्रतिकृती बनवून त्यांना गुन्हा गोळ्या घालून देशाचा पहिला आतंकवादी नथुराम गोडसे याचा उदोउदो करणाऱ्या संघटनांचा निषेधही यावेळी करण्यात आला.

पुढारी पृ. पान क्र. 2

# अर्नाळ्यात लॉजिंगवर वेश्याव्यवसाय

**मिरारोड :** अर्नाळा येथील लॉजिंगमध्ये वेश्याव्यवसाय करत असल्याप्रकरणी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांनी कारवाई करून एका पिडीत महिलेची सुटका करण्यात आली आहे. अर्नाळा पोलीस ठाण्याचे हद्दीतील आशीर्वाद लॉज, नालासोपारा पश्चिम या ठिकाणी लॉजचा चालक किरण नाईक हा ग्राहकांना वेश्यागमनासाठी महिलांना पुरवत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक कक्ष, नालासोपारा यांना मिळाली. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पो.नि. संतोष चौधरी यांनी पथकासह लॉजमध्ये कारवाईसाठी गेले असता लॉजचे चालक किरण नाईक याने वेश्यागमनासाठी मुलगी उपलब्ध करून देत असल्याचे व त्याबदल्यात मोबदला घेत असताना पोलीस पथकाने छापा टाकून कारवाई केली. लॉजचा चालक किरण जगन्नाथ नाईक याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता लॉज मालक आकाश भालचंद्र गोवारी व बंटी यांच्या मदतीने व्यवसाय करत असल्याचे सांगितले. आरोपी किरण जगन्नाथ नाईक, पाहिजे आरोपी आकाश भालचंद्र गोवारी व बंटी यांच्याविरुद्ध अर्नाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CS CamScanner

दि. 05/04/2023

पुढारी पु. पान क्र. 3

# चोऱ्या करणाऱ्या दोघांना अटक

## ४ गुन्ह्यांची उकल करण्यात आचोळे पोलिसांना यश

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

आचोळे पोलीस ठाणे हद्दीत चोरी व जबरी चोरी करणाऱ्या दोघांना आचोळे पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करून त्यांनी केलेले ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत.



आचोळे गावात राहणारे इरशाद मोहम्मद रफी सय्यद हे एव्हरशाईन सिटी ते संत सेवालाल नगरकडे जाणाऱ्या रत्यावरुन आचोळे गाव या दिशेने हातामध्ये मोबाईल फोन घेवून पायी चालत जात असताना त्यांच्या पाठीमागुन दोन अज्ञात इसम हे मोटार सायकलवरुन येवुन त्यांच्या हातातील मोबाईल फोन जबरदस्तीने खेचून चोरी करुन पळुन गेले. त्याबाबत आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याच्या तपासादरम्यान वसई- नालासोपारा परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन चोरी व जबरी चोरीच्या गुन्हयांत वाढ झालेली आहे. या घटनांची वरिष्ठांनी दखल घेवुन आरोपींचा शोध घेवून गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे आचोळे पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपी विनायक पद्मा पुजारी, जनक महाविर सिंग साऊद यांना ताब्यात घेवुन तपास केला असता या आरोपींनी गुन्हा केल्याचे सांगितले. या गुन्ह्यात आरोपींना अटक करून त्यांच्याकडे अधिक तपास केला असता त्यांनी ४ गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून त्यांच्याकडून ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

म.टा. पु. पान क्र. 1

# मिरा रोड पूर्व-पश्चिम प्रवास शक्य

**भाविक पाटील, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरकरांना मुंबईच्या दिशेने जाताना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये, म्हणून पर्यायी दहिसर-भाईंदर लिंक रोडचे काम लवकरच हाती घेतले जाणार आहे. या लिंक रोडला जोडण्यासाठी मिरा रोड येथे पूर्व-पश्चिमेला जोडणारा रेल्वेवरील उड्डाणपूल उभारला जाणार आहे. एमएमआरडीएच्या निधीतून हा उड्डाणपूल उभारला जाणार आहे. पालिका आयुक्तांनी नुकताच सरकारला त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यासाठीचा ठराव मंजूर केला आहे. त्यासाठी लागणारी जमीन हस्तांतरित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

**पुलाचे काम लवकरच सुरू होणार**

- एमएमआरडीएद्वारे उभारणी
- जमीन हस्तांतरणाचा ठराव मंजूर
- मुंबईच्या दिशेने प्रवास होणार सुलभ

मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांना मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी दहिसर टोल नाका येथून पश्चिम द्रुतगती महामार्गाचा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. याच मार्गावरून विविध जिल्ह्यांतून तसेच परराज्यांतून येणारी वाहने मुंबईत जातात असतात. त्यामुळे येथे कायमच वाहतूक कोंडी होत असते. याचा सर्वाधिक त्रास मिरा-भाईंदरवासियांना सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर, मिरा-भाईंदरसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रस्तावित बोरिवली ते गोराई लिंक रोडचा विस्तार करून, तो रस्ता पुढे दहिसर ते भाईंदरपर्यंत नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या रस्त्यासाठीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

**असा असेल रेल्वे पूल**

दहिसर-भाईंदर लिंक रोड हा मिरा रोड पश्चिमेकडून जाणार आहे. या लिंक रोडला जोडण्यासाठी मिरा रोडच्या शहीद मेजर कौस्तुभ राणे उद्यानाजवळील मार्गावर रेल्वे पूल उभारला जाणार आहे. तो मिरा रोड पश्चिमेला लिंक रोडशी जोडला जाणार आहे. हा पूल चारपदरी असणार असून त्याला जोडण्यासाठीचे रस्तेदेखील नवीन विकास आराखड्यात दर्शवण्यात आले असल्याची माहिती शहर अभियंता दीपक खांबीत यांनी दिली.

लिंक रोडला जोडण्यासाठी मिरा रोड पूर्व-पश्चिमेला जोडणारा रेल्वे पूल उभारण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी नोव्हेंबरमध्ये एका बैठकीत एमएमआरडीएला दिले होते. सद्यस्थितीत मिरा रोड पूर्व-पश्चिमेला जोडणारा रस्ता नाही. त्यामुळे हा पूल उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार लिंक रोडच्या कामात रेल्वे पुलाचा समावेश करत, तो एमएमआरडीएमार्फत उभारण्याचा प्रस्ताव पालिकेच्या बांधकाम विभागाने पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्यापुढे सादर केला होता. त्याला मंजुरी देत, त्यासाठीची जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पालिकेमार्फत राबवण्याचे निश्चित करण्यात आले आहे. हा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी राज्य सरकारकडे सादर केला जाणार आहे.

CamScanner

दि. 05/04/2023

लोकमत मु. पान क्र. १

## माजी नगरसेवकानेच गुटखा विक्रेत्यास पकडून दिले



लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला माजी नगरसेवकाने गुटखा विक्रेत्यास पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना समोर आली आहे.

भाईंदर पश्चिम येथील मुर्धा पालिका शाळेजवळील दुकानात अशोककुमार कालीशंकर साहू (वय ३८) गल्ली नंबर २४, रेवाआगार, मुर्धागाव हा गुटखा विक्री करीत असल्याचे माजी नगरसेवक रोहित सुवर्णा व त्यांचे सहकारी तुषार पुजारी यांनी पोलिसांना शुक्रवारी कळविले. साहू पळून जाऊ नये यासाठी सुवर्णा आणि पुजारी यांनी त्याला पकडून ठेवले. भाईंदर पोलिस घटनास्थळी आल्यावर तपासणी केली असता त्याच्याकडे १९ हजार ७६० रुपये किमतीचा दोन गोणी गुटखा सापडला. पोलिसांनी साहू व गुटखा ताब्यात घेऊन भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## केवायसी अपडेटच्या आड फसवणूक



लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** केवायसी अपडेट देण्याच्या नावाने भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट भागातील ललित जैन यांची फसवणूक झाली आहे. जैन यांच्या मोबाइलवर एकाने कॉल करून केवायसी अपडेट करण्यासाठी ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. ॲप डाउनलोड केल्यानंतर जैन यांची ऑनलाइन १ लाख ४९ हजार ४९९ रुपयांची फसवणूक झाली. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

लोकमत पान क्र. ३

## बालिकेचे केले अपहरण

**नालासोपारा :** नालासोपारा येथे दहा वर्षांच्या बालिकेचे अपहरण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. संतोष भुवन परिसरात राहणारी अल्पवयीन मुलगी २ एप्रिलला संध्याकाळी पाचच्या सुमारास राहत्या घराबाहेर खेळत असताना आरोपीने तिला आमिष दाखवून सोबत पळवून नेले होते. सोमवारी तुळिंज पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## विवाहितेची आत्महत्या

**नालासोपारा :** वसई २१ वर्षीय विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सातिवली, मौर्या नाका येथील आदर्शनगरमध्ये राहणाऱ्या मिसबा अक्रम राईन या विवाहितेने सोमवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास राहत्या घरी फॅनला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

पुण्यनगरी मु. पान क्र. १

## काशिमीरा येथे २२ लाखांचे मोबाईल व इलेक्ट्रॉनिक साहित्याची चोरी

**मीरा रोड :** काशिमीरा येथील पेणकरपाडा परिसरातून टेम्पोत भरून ठेवलेले २२ लाखांचे मोबाईल व इलेक्ट्रॉनिक साहित्याची अज्ञात चोरट्यांनी चोरी केली. त्याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोड परिसरात राहणारे अनिकेत नवनाथ पवार यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांचा भाईंदर येथील एका इलेक्ट्रॉनिक साहित्य विक्री करणाऱ्या दुकानामध्ये टेम्पो चालतो. भिवंडी येथे असलेल्या गोडाऊनमधून दुकानासाठी लागणारे इलेक्ट्रॉनिक साहित्य घेऊन येतात. त्या टेम्पोचा चालक पेणकर पाडा येथे राहतो. दररोज साहित्य घेऊन आल्यानंतर रात्री टेम्पो पेणकर पाडा येथे उभा करून ठेवतात. नेहमीप्रमाणे टेम्पोमध्ये साहित्य भरून पेणकरपाडा येथे उभा केला होता. त्यामध्ये टीव्ही, फ्रीज, मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटर ॲक्सेसरीज असे इलेक्ट्रॉनिक साहित्य होते. दुसऱ्या दिवशी सकाळी येऊन पाहिले असता टेम्पोमध्ये मोबाईलचे रिकामे बॉक्स पडलेले व दरवाजाचा लॉक तोडलेला दिसला. यावेळी अज्ञात चोरट्यांनी टेम्पोच्या दरवाजाचे लॉक तोडून आत वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल, वॉच, पेनड्राईव्ह, हेअर ड्रायर, पेनड्राईव्ह असे इलेक्ट्रॉनिक सामान चोरीस गेल्याचे दिसून आले.

CamScanner

दि. 05/04/2023

सामना पान क्र.3



## मंत्रालयाच्या दारात केले होते विषप्राशन

# पोलीस पत्नी संगीता डवरे यांची मृत्यूशी झुंज अखेर संपली

### पुण्यातील ससून रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास

नवी मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) – पोलीस पत्नी संगीता डवरे यांची मृत्यूशी झुंज आठ दिवसांनंतर आज अखेर संपली. पामबीच मार्गावर लावलेल्या नाकाबंदीत कर्तव्य बजावत असताना अपघातात जखमी झालेले पोलीस हवालदार हनुमंत डवरे यांना न्याय देण्यात पोलीस दल अपयशी ठरले. त्यामुळे निराश झालेल्या त्यांच्या पत्नी संगीता डवरे यांनी २७ मार्च रोजी मंत्रालयाच्या दारात विषप्राशन केले होते. त्यांना प्रथम जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र नंतर त्यांना नातेवाईकांनी पुणे येथील ससून रुग्णालयात हलवले. उपचार सुरू असताना आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

उलवे नोडमध्ये राहणारे पोलीस हवालदार हनुमंत डवरे नवी मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेत कार्यरत आहेत. ते गायमुख पोलीस चौकी सेवेत असताना १२ फेब्रुवारी २०२२ च्या रात्री पामबीच मार्गावरील टी. एस. चाणक्य चौकात नाकाबंदी लावण्यात आली होती. मध्यरात्री दीडच्या सुमारास सुसाट आलेल्या इनोव्हा कारने नाकाबंदीचे बॅरिकेड्स तोडले. या गाडीखाली डवरे चिरडले गेले. त्यांच्या हात आणि पायांचा अक्षरशः चुरा झाला. कारचालक दारू पिऊन तर्राट होते. त्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक होते. मात्र नेरूळ पोलिसांनी थातूरमातूर कारवाई करून कारचालकाला सोडून दिले.

कारचालकावर कठोर कारवाई करण्यासाठी संगीता डवरे यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना विनंती केली, मात्र त्यांची कोणीच दखल घेतली नाही. त्यांनी न्यायासाठी मंत्रालयाचे उंबरठेही झिजवले, मात्र तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. आपल्या पोलीस पतीला पोलीस दलाकडूनच न्याय मिळत नाही हे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी १५ मार्च रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला. त्यानंतरही सरकारने त्यांची दखल न घेतल्याने त्यांनी २८ मार्च रोजी मंत्रालयाच्या दारात विषप्राशन केले. हा प्रकार बंदोबस्तावरील पोलिसांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांना तातडीने जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुसऱ्या दिवशी त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना पुणे येथील ससून रुग्णालयात हलवले. त्या ठिकाणी उपचार सुरू असताना आज सकाळी त्यांचे निधन झाले.

### तीन किलोमीटरच्या प्रवासासाठी दोन तास

मी पोलीस असूनही मला न्याय देण्यात पोलीस दल अपयशी ठरले. त्याचा जोरदार धक्का माझ्या पत्नीला बसला आणि त्यातून तिने स्वतःचे जीवन संपवले. विषप्राशन केल्यानंतर तिला जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. मंत्रालयापासून जे. जे. रुग्णालय तीन किलोमीटर अंतरावर आहे. मात्र हे अंतर कापण्यासाठी मरीन ड्राइव्ह पोलिसांनी दोन तास लावले. संगीताला लोणंद येथील रुग्णालयात दाखल केले असता सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी डॉक्टरवर दबाव आणून तेथून डिस्चार्ज घेण्यास भाग पाडले. त्यामुळे माझ्या पत्नीच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संगीता यांचे पती हनुमंत डवरे यांनी केली आहे.

सकाळ पान क्र. 5

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी तिघांना कोठडी

नालासोपारा, ता. ४ (बातमीदार) : सासरच्या जाचाला कंटाळून वसईत २३ वर्षीय विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी वालिव पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संशयितांना कोठडी सुनावण्यात आली.

पूनम (वय २३) हिच्या मृत्युप्रकरणी तिचा पती रूपेश पालवे (वय ३६), सासू सुनीता महादेव पालवे (वय ६३), नणंदेचा नवरा देवानंद नारायण पाटील (वय ५६, सर्वजण रा. भोयदापाडा, वसई) यांच्यावर गुन्हा दाखल आहे. लग्नानंतर सासरच्या मंडळींकडून तिचा छळ होत असल्याने तिने ३० मार्च रोजी आत्महत्या केली. या प्रकरणात पूनमच्या नातेवाईकांच्या तक्रारीवरून सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## ट्रेलर-कारचा महामार्गावर अपघात

नालासोपारा, ता. ४ (बातमीदार) : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ट्रेलर आणि कारचा भीषण अपघात झाला. वसई हद्दीत ससूनवघर येथील पुलाच्या जवळ आज (ता. ४) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास अपघातात कारचालक गंभीर जखमी झाला असून, स्थानिक नागरिक आणि वालीव पोलिसांनी त्याला कारमधून बाहेर काढून, खासगी रुग्णालयात दाखल केले. मुंबईवरून गुजरातला जाणाऱ्या ट्रेलर चालकाचे नियंत्रण सुटल्याने तो मुंबई मार्गिकेवर येऊन कारवर आदळल्याने अपघात झाला.

CamScanner

दि. 05/04/2023

लोकसत्ता पु. पान क्र. 4

# शहरात १५८, तर रेल्वेच्या हद्दीत ६६ बेवारस मृतदेह

## वसई-विरार पोलिसांपुढे तपासाचे आव्हान

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार शहरात बेवारस मृतदेह आढळून येण्याचे प्रमाण वाढले आहे. २०२२ मध्ये शहरात १५८, तर वसई रेल्वेच्या हद्दीत ६६ बेवारस मृतदेह आढळून आले आहेत. वाढत्या बेवारस मृतदेहांमुळे त्यांची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

वसई-विरार शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. शहरात विविध ठिकाणांहून नागरिक स्थलांतरित होऊन राहण्यासाठी येत आहेत. यामुळे सध्या शहराची लोकसंख्या २५ लाखांहून अधिक झाली आहे. त्यात शहरात एकट्याने राहणारे, ओळख नसलेले नागरिकही मोठ्या संख्येत आहेत. त्यामुळे मृत्यूनंतर त्यांची दखल घेणारे कुणी नसतात. पोलीस आयुक्तालयाच्या

| पोलीस आयुक्तालय हद्दीत २०२२ मधील बेवारस मृतदेह | |
|---|---|
| परिमंडळ १ (मीरा भाईंदर) | ४९ |
| परिमंडळ २ (वसई) | ५३ |
| परिमंडळ ३ (विरार) | ५६ |
| एकूण | १५८ |

हद्दीत २०२२ मध्ये १७८ मृतदेह आढळले. त्यांचा मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे झाला होता. काहींचा मृत्यू आजाराने, तर काहींचा मृत्यू अपघाताने झाला होता. त्यापैकी केवळ २५ मृतदेहांची ओळख पटवता आली आहे. उर्वरित १५८ बेवारस मृतदेहांवर पोलिसांनीच अंत्यसंस्कार केले आहेत.

२०२२ या वर्षात वसई रेल्वेच्या हद्दीत ६६ बेवारस मृतदेह आढळून आले. २०२१ मध्ये ३३ बेवारस मृतदेह आढळले होते. २०२२ मध्ये हे प्रमाण दुपटीने वाढले आहे. चालू वर्षात जानेवारी ते २९ मार्च २०२३ या तीन महिन्यांच्या कालावधीत १८ बेवारस मृतदेह आढळले आहेत.

**पोलिसांकडून अंत्यसंस्कार**

मृत व्यक्तीचे वारस सापडावेत व ओळख पटावी, यासाठी मृतदेह सात दिवस शवागारात ठेवला जातो. त्याची माहिती स्थानिक दैनिकांतून जाहीर करून त्याच्या वारसांना संपर्क करण्याचे आवाहन केले जाते. वारस न सापडल्यास बेवारस म्हणून मृतदेहावर पोलीस अंत्यसंस्कार करतात. अनेकदा समुद्रकिनाऱ्यावर बेवारस मृतदेहांचे दफन केले जाते. बेवारस मृतदेहांचे दफन करण्यासाठी जागेची मागणी करण्यात आली होती. वसईच्या सनसिटी येथे दफनभूमी तयार करण्यात येत आहे. तेथे बेवारस मृतदेहांचे दफन करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे.

## वसईत हत्येप्रकरणी एकास अटक

**वसई :** वसईच्या वाघरळपाडा येथे एका महिलेने आपल्या प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी प्रियकराला अटक केली आहे.

वसई पूर्वेच्या वाघरळपाडा येथे सुनीलकुमार दुबे (३२) हा पत्नी मुन्नीदेवी दुबे (२४) हिच्यासह राहत होता. दरम्यान मुन्नीदेवी हिचे याच परिसरात राहणाऱ्या संजयकुमार प्रसाद याच्याशी प्रेमसंबंध जुळले होते. त्यामुळे दुबे दाम्पत्यात भांडणे होऊ लागली होती. त्यामुळे मुन्नीदेवी हिने संजयकुमार याच्या मदतीने पतीची हत्या करण्याची योजना आखली. त्यानुसार संजयकुमार याने सुनीलकुमार याला वाघरळपाडा येथील डोंगरावर नेले. तेथे त्याला भरपूर दारू पाजली. त्यानंतर नशेत असताना त्याला टेकडीवरून खाली ढकलले. त्यानंतरही तो जिवंत होता. त्यामुळे संजयकुमार याने त्याची गळा आवळून हत्या केली. याप्रकरणी वालीव पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

CamScanner

दि. 05/04/2023

लोकसत्ता पान क्र. १

### ठाण्यात आज आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वाखाली मोर्चा

# ठाकरे गटाच्या कार्यकर्तीला मारहाण; संघर्षाची नवी ठिणगी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**ठाणे, नागपूर :** ठाण्यात ठाकरे गटाची कार्यकर्ती रोशनी शिंदे हिला शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या मारहाणीचे मंगळवारी राजकीय वर्तुळात जोरदार पडसाद उमटले. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रुग्णालयात जाऊन रोशनी यांची भेट घेतल्यानंतर सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले. राज्याला फडतूस गृहमंत्री लाभला आहे, अशी टीका ठाकरे यांनी केली. त्यावर, फडतूस कोण आहे, हे संपूर्ण राज्याला ज्ञात आहे, असे प्रत्युत्तर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

> राज्याला फडतूस गृहमंत्री लाभला आहे. अत्यंत लाचार, लाळघोटेपणा करणारा, उपमुख्यमंत्रीपद मिळाले म्हणून नुसती फडणविसी करणारा एक माणूस गृहमंत्री म्हणून मिरवतोय. आता मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळ विस्तारात गुंडमंत्री असे पद निर्माण करून त्या मंत्र्याला गुंड पोसण्याचे काम द्यावे. **उद्धव ठाकरे**, माजी मुख्यमंत्री



> उद्धव ठाकरे यांनी जी भाषा वापरली तिच्यापेक्षा जास्त खालच्या पातळीवर जाऊन मला बोलता येते. दोन मंत्री कारागृहात असताना त्यांनी त्यांचे राजीनामे घेतले नाहीत. तेव्हा लाळ घोटत होते. त्यामुळे खरा लाचार आणि फडतूस कोण आहे, हे महाराष्ट्रातील जनतेला माहिती आहे. **देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री



पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात फेसबुकवर आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याचा आरोप करत शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी रोशनी शिंदे यांना सोमवारी रात्री मारहाण केली होती. त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उद्धव ठाकरे यांच्यासमवेत आदित्य ठाकरे, रश्मी ठाकरे यांनी रुग्णालयात जाऊन रोशनी यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

ठाण्यात शिंदे गटाची गुंडगिरी वाढायला लागल्याचा आरोप करत ठाकरे यांनी मुख्यमंत्री *(पान ४ वर)*

## ठाकरे गटाच्या कार्यकर्तीला मारहाण; संघर्षाची नवी ठिणगी

**(पान १ वरून)** आणि उपमुख्यमंत्र्यांवर टीका केली. ''महिलांचे रक्षण करणाऱ्या शिवसैनिकांचे ठाणे, धर्मवीर आनंद दिघेंचे ठाणे, अशी ठाण्याची ओळख आहे. पण, ती पुसून गुंडांचे ठाणे असे नामकरण करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे'', अशी टीका ठाकरे यांनी केली.

या टीकेला फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. ''अडीच वर्षे घरी बसून काम करणाऱ्या व्यक्तीबाबत प्रतिक्रिया देणे योग्य नाही. नैराश्येतून त्यांचा थयथयाट सुरू आहे. मात्र त्यांनी आम्हाला राजकारण शिकवू नये. आम्ही संयमाने वागणारे लोक आहोत. आमचे तोंड उघडले तर पळता भुई थोडी होईल'', असा इशारा फडणवीस यांनी दिला. ''मी पाच वर्षे गृहमंत्री होतो. त्यामुळे जनतेच्या समस्या कशा सोडवायच्या, याची मला माहिती आहे'', असे फडणवीस म्हणाले.

CamScanner

लोकमत

# कळंबमधील लॉजिंगवर कारवाई; पीडितेची सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : कळंब येथील आशीर्वाद लॉजचा चालक किरण नाईक हा पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनाकरिता महिला पुरवितो व गिऱ्हाइकांकडून मोबदला स्वीकारतो, अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांना ३ एप्रिलला गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. या अनुषंगाने कारवाई करीत एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलिस निरीक्षक संतोष चौधरी यांनी माहितीची खातरजमा करून कायदेशीर बाबींची पूर्तता केली आणि आशीर्वाद लॉज येथे बोगस गिऱ्हाईक पाठवले. लॉजचे चालक किरण नाईक याने वेश्यागमनासाठी तरुणी उपलब्ध करून दिली व त्या बदल्यात मोबदला स्वीकारत असताना पोलिस पथकाने कारवाई करून किरण नाईक यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता तो लॉजमालक आकाश गोवारी व बंटी यांच्या मदतीने हा व्यवसाय करत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी किरण नाईक, आकाश गोवारी व बंटी यांच्याविरुद्ध पोलिस हवालदार महेंद्र शेट्टे यांनी अर्नाळा पोलिस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. लॉजचालक किरण नाईक यास अटक झाली आहे.



CS CamScanner

लोकमत

# वसईत जबरी चोरी करणाऱ्या सराईत दुकलीला केले जेरबंद

## चार गुन्ह्यांची उकल : आचोळे पोलिसांना यश



सराईत दुकलीला अटक करून चार गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे. मुद्देमालासह आचोळे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : जबरी चोरी करणाऱ्या सराईत दुकलीला अटक करून चार गुन्ह्यांची उकल करण्यात आचोळे गुन्हे प्रकटीकरणच्या पोलिसांना यश आले आहे. आचोळे पोलिस दोन्ही आरोपींकडे तपास करत आहेत, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी मंगळवारी दिली आहे.

२६ मार्चला रात्री इरशाद मोहम्मद रफी सय्यद हे एव्हरशाइन सिटी ते संत सेवालाल नगरच्या रस्त्यावरून आचोळे गावाच्या दिशेने पायी चालत जात होते. त्यावेळी जीमसमोर आले असता दोन आरोपींनी दुचाकीवरून येऊन त्यांच्या हातातील मोबाइल खेचून पळून गेले. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला होता.

आचोळे पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी विनायक पद्मा पुजारी आणि जनक महावीर सिंग साऊद या दोघांना ताब्यात घेऊन तपास केला. त्यांनी गुन्हा केल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. अटक आरोपीकडे अधिक तपास करून चार गुन्हे उघडकीस आणून ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही कामगिरी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आचोळे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) सुधीर गवळी, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक यशपाल सूर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक सुहास म्हात्रे, संदीप भोसले, सहायक फौजदार राजेश काळपुंड, पोलिस हवालदार दत्तात्रय दाईंगडे, करण भवर, बालाजी संगमे, विनायक कचरे, मोहनदास बंडगर यांनी केली आहे.



CamScanner

# मुंबई चौफेर

## ज्येष्ठ नागरिक व महिलांना पोलीस ठाण्यात प्रथम प्राधान्य

भाईंदर - नवघर पोलीस ठाण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना तक्रार देण्यासाठी कोणतीही प्रतीक्षा करावी लागणार नसून पोलीस ठाण्यात प्रथम प्राधान्य दिले जाणार असल्याचे नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी सांगितले आहे.

आयुक्त मधुकर पांडे यांनी नागरिकांच्या समस्येच्या दृष्टीने अनेक [illegible] सुधारणा केल्या आहेत. [illegible] नियमित दिवसाला [illegible] सामावेश आहे. प्रत्येक [illegible] तक्रारी घेऊन पोलीस ठाण्यात आलेल्या [illegible] महिलांच्या व [illegible] निवारण करण्यासाठी लक्ष देण्यात येत आहे. त्याचबरोबर पोलीस आयुक्तालयांतर्गत तक्रारी करता सुरू करण्यात आलेल्या डायल ११२ या [illegible] प्रतिसाद लवकरात लवकर मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार असून, इमारतीत काही ठिकाणी पोलीस गस्तीकरिता [illegible] लक्ष दिले जाणार आहे. नवघर पोलीस ठाण्यात [illegible] पोलीस [illegible] प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्यांना [illegible] ठाण्यात आलेल्यांना पूर्वीचे पोलीस निरीक्षक [illegible] देसाई यांनी निर्णय [illegible] असून, त्यांच्या जागी विजय पवार यांना नियुक्त करण्यात आले आहे. पवार यांनी नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार अथवा अवैध धंदे चालू देणार नसल्याचे सांगितले आहे. नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असणाऱ्या [illegible] जुगार [illegible] चालू ठेवणार का? [illegible] सुरू असणारी दुकाने वेळेवर बंद होणार का असे प्रश्न आता उपस्थित झाले आहेत.

CamScanner

# महावीर जयंतीनिमित्त बारा ठिकाणी मिरवणुका

भाईंदर. मिरा-भाईंदर शहरात मंगळवारी सकाळी महावीर जयंती उत्सव साजरा करण्यात आला असून महावीर जयंतीनिमित्त शहरात एकूण १२ ठिकाणी मिरवणुका, १ शोभायात्रा, १ मोटार सायकल रॅली, तसेच ठिकठिकाणी पूजा-अर्चा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत महावीर यांची ६५ मंदिरे, देरासर आहेत. महावीर जयंती उत्सवाच्या अनुषंगाने मागील पाच वर्षांच्या कालावधीत एकही गुन्हा दाखल नाही. महावीर जयंती उत्सवाच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, याकरता आयुक्तलयाच्यामार्फत योग्य तो बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

CS CamScanner

# महिला, ज्येष्ठांना पोलीस ठाण्यात प्राधान्य

भाईंदर, (वा.) नवघर पोलीस ठाण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना तक्रार देण्यासाठी कोणतीही प्रतीक्षा करावी लागणार नसून पोलीस ठाण्यात प्रथम प्राधान्य दिले जाणार असल्याचे नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी सांगितले आहे.

आयुक्त मधुकर पांडे यांनी नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने अनेक योजना राबवल्या आहेत. यात तक्रार निवारण दिनाचा देखील समावेश आहे. प्रत्येक शनिवारी नवघर पोलीस ठाण्यात जास्तीत जास्त महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्याकडे लक्ष देण्यात येणार आहे. त्याचबरोबर पोलीस आयुक्तालयामार्फत मदतीकरता सुरू करण्यात आलेल्या डायल ११२ चा प्रतिसाद लवकरात लवकर मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार असून कमीतकमी वेळात पोलीस मदतीकरता घटनास्थळी कसे पोहचू शकतील? याकडे लक्ष दिले जाणार आहे.



नवघर पोलीस ठाण्यात लाच घेतल्याप्रकरणी एका पोलीस कर्मचाऱ्याला अटक करण्यात आल्यानंतर पूर्वीचे पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.

त्यांच्या जागी विजय पवार यांना नियुक्त करण्यात आले आहे. पवार यांनी नवघर पोलीस स्टेशनच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार अथवा अवैध धंदे चालू देणार नसल्याचे सांगितले आहे. नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असणाऱ्या गुटखा विक्रीवर पवार रोख लावू शकणार का? रात्री उशिरापर्यंत सुरू असणारी दुकाने वेळेवर बंद होणार का? असे प्रश्न आता उपस्थित झाले आहेत.

दैनिक दबंग दुनिया

# आचोले पुलिस ने पकड़ा चोरी करने वाला गिरोह, दो गिरफ्तार



**दबंग रिपोर्टर » नालासोपारा**

चोरी व जबरन चोरी के आरोपियों को आचोले पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने गिरफ्तार किया है। इनकी गिरफ्तारी से 75 हजार रुपये का माल व 4 अपराधों (लूट-चोरी) की गुत्थी सुलझाई है। यह कार्रवाई परिमंडल 2 डीसीपी पौर्णिमा चौगुले-श्रृंगी व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में आचोले थाने के पी.आई चंद्रकांत सरोदे व पी.आई (क्राइम) सुधीर गवली की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि 26 मार्च को रात्रि लगभग 10.10 बजे के आसपास शिकायतकर्ता इरशाद मोहम्मद रफी सय्यद, निवासी-संतोषी माता मंदिर के पास, आचोले गांव, नालासोपारा पूर्व स्थित रहता है। शिकायतकर्ता इरशाद हाथ में फोन लेकर एवरशाइन सिटी से संत सेवालाल नगर होते हुए आचोले गांव की ओर पैदल जा रहा था, जैसे ही फिटनेस क्वीन जिम के पास पहुंचा,तभी 30 से 35 वर्ष की आयु के दो अज्ञात व्यक्ति उनके पीछे एक मोटरसाइकिल पर आए और जबरन शिकायतकर्ता के हाथ से मोबाइल फोन छीन कर फरार हो गए। इस मामले में आचोले थाने में शिकायतकर्ता ने अज्ञात आरोपी के ऊपर केस दर्ज करवाया था। पुलिस अधिकारी ने कहा कि वसई-नालासोपारा क्षेत्र में पिछले कुछ महीनों से चोरी और जबरन चोरी के अपराधों में वृद्धि देखी गई है,वरिष्ठों ने उक्त घटनाओं को गंभीरता से लेते हुए आरोपियों को खोजने व अपराधों का पर्दाफाश करने के संबंध में निर्देश व मार्गदर्शन दिया था।गुप्त मुखबिरों एवं तकनीकी विश्लेषण के माध्यम से प्राप्त सूचना के आधार पर आचोल थाने के क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों एवं कर्मचारियों ने आरोपी (1). विनायक पद्मा पुजारी व (2).जनक महाविर सिंह साऊद को हिरासत में लेकर पूछताछ करने पर पता चला कि उक्त आरोपी ने उपरोक्त अपराध को अंजाम दिया है,उसे गिरफ्तार कर लिया गया है।आगे की जांच के बाद,आरोपियों की गिरफ्तारी में 4 अपराध प्रकाश में आए हैं और कुल 75,000/- रुपये का माल जब्त किए गए हैं।

CS CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-290 मुंबई, बुधवार 5 अप्रैल 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# लूटपाट-चोरी की 4 गुत्थी सुलझी ,2 गिरफ्तार

**नालासोपारा :** चोरी व लूट के आरोपियों को आचोले पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने गिरफ्तार किया है। इनकी गिरफ्तारी से 75 हजार रुपये का माल व 4 अपराधों (लूट-चोरी) की गुत्थी सुलझाई है। यह कार्रवाई परिमंडल 2 डीसीपी पौर्णिमा चौगुले-श्रींगी व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में आचोले थाने के पी.आई चंद्रकांत सरोदे व पी.आई (क्राइम) सुधीर गवली की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है।

पुलिस अधिकारी ने कहा कि वसई-नालासोपारा क्षेत्र में पिछले कुछ महीनों से चोरी और लूट के अपराधों में वृद्धि देखी गई है, आचोल थाने के क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों एवं कर्मचारियों ने आरोपी (1). विनायक पद्मा पुजारी व (2).जनक महाविर सिंह साऊद को हिरासत में लेकर पूछताछ करने पर 4 अपराध प्रकाश में आए हैं और कुल 75,000/- रुपये का माल जब्त किए गए हैं।

CamScanner

روزنامہ اردو ٹائمز ممبئی

URDU TIMES DAILY

Arbaa, 15 Ramadan 1444 AH

Wednesday, April, 05, 2023

# اہل امیدواروں کا تحریری امتحان پر امن طریقے سے مکمل ہوا

## پاس ہونے والے 996 پولیس ملازمین کو کمشنریٹ میں بھرتی کیا جائے گا



بھائندر (عظیم تمبولی) مہاراشٹر پولیس بھرتی 2021 کے تحت اہل امیدواروں کا تحریری امتحان 2 اپریل کو کمشنریٹ آف پولیس، میرا-بھائیندر، وسائی ویرار کے دفتر کے ذریعے منعقد کیا گیا۔ امتحان میں کل 127,12 اہل امیدواروں نے شرکت کی۔ ان میں 3,269 خواتین اور 858,8 مرد شامل ہیں۔ تحریری امتحان پر امن طریقے سے مکمل ہوا ہے۔ پولیس کمشنر مدھوکر پانڈے نے بتایا ہے کہ امتحان کے دوران کسی قسم کی کوتاہی نہیں ہوئی۔ میرا-بھائیندر، وسائی-ویرار پولس کمشنریٹ میں پولس فورس کی کمی کا مسئلہ جلد ہی حل کیا جائے گا اور تحریری امتحان پاس کرنے کے بعد کمشنریٹ میں 996 پولیس ملازمین کی بھرتی کی جائے گی۔ نیتاجی سبھاش چندر بوس میدان اور آنجہانی بالا صاحب ٹھاکرے میدان کو کمشنریٹ نے تحریری امتحان کے لیے منتخب کیا تھا، جسے میرا-بھائیندر میونسپل کارپوریشن نے مفت دستیاب کرایا تھا۔ خواتین کا تحریری امتحان آنجہانی بالا صاحب ٹھاکرے میدان میں اور مردوں کا تحریری امتحان سبھاش چندر بوس میدان میں لیا گیا تھا۔ اس امتحان میں پہلی بار ہائی ٹیک ٹیکنالوجی کا استعمال کیا گیا۔ امتحانی مقام پر 50 سی سی ٹی وی کیمرے نصب کیے گئے تھے، اس کے علاوہ ہینڈی کیم کیمرے سے شوٹنگ بھی کی گئی۔ ہر امیدوار کو کمپیوٹر چپ لگائی گئی تھی۔ سیکورٹی کے نقطہ نظر سے ایڈیشنل کمشنر پولیس ہیڈ کوارٹر ڈپٹی کمشنر کی سربراہی میں 3 اسسٹنٹ کمشنرز، 21 پولیس انسپکٹرز، 36 اسسٹنٹ پولیس انسپکٹرز اور 231 سب انسپکٹرز اور پولیس اہلکار تعینات کیے گئے۔ سیکورٹی کے نقطہ نظر سے ایڈیشنل کمشنر پولیس ہیڈ کوارٹر ڈپٹی کمشنر کی سربراہی میں 3 اسسٹنٹ کمشنرز، 21 پولیس انسپکٹرز، 36 اسسٹنٹ پولیس انسپکٹرز اور 231 سب انسپکٹرز اور پولیس اہلکار تعینات کیے گئے۔

CS CamScanner

लोकमत

लोकमत इन्फोग्राफिक्स

# गाडी चालवायचे वय नाही; पाच हजारांचा दंड भरा!

मंगेश कराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मार्च महिन्यात अनेक परीक्षा झाल्या. या काळात अल्पवयीन मुले गाड्या चालवीत असल्याचे मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाले. वय नसताना वाहन चालविल्यास ५ हजारांचा दंड वाहतूक शाखेकडून होतो. मुलांकडून अपघात झाल्यास त्यांच्या पालकांना मोठी शिक्षा होऊ शकते. त्यामुळे पालकांनी जर आपल्या पाल्याकडे परवाना नसेल तर त्यांच्या हातात वाहन चालविण्यास देऊ नये, असे आवाहन वाहतूक शाखेने केले आहे.



## महिन्याभरात एकही कारवाई नाही

वसई आणि विरार या दोन्ही ठिकाणी मार्च महिन्यामध्ये याप्रकरणी एकही कारवाई झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. पोलिस शक्यतो रॉंग साइड, सिग्नल जम्पिंग, ट्रिपल सीट, हेल्मेट, सीटबेल्ट लावले नसताना वाहन चालविणे, ब्लॅक फिल्म यावर कारवाई करतात.


## अल्पवयीन मुलांवर कारवाई

कोणत्याही व्यक्तीला १८ वर्षे झाल्याशिवाय वाहन चालविण्याचा परवाना दिला जात नाही. तरीही १८ वर्षांच्या आतील मुलगा अथवा मुलीने वाहन चालवून वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्या पालकांना दोषी धरले जाते. त्या अल्पवयीन मुलांवरही कारवाई केली जाते.

## सर्वाधिक दंड वसूल ट्रिपल सीटचा

अल्पवयीन असल्याने गाडी चालविण्याचे लायसन्स मिळत नाही. या मुलांना दुचाकी कशी चालवायची, याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण नसते. त्यांना वाहतुकीच्या नियमांची माहिती नसते; पण तरीही पालकांकडून त्यांना गाडी दिली जाते. हे धोकादायक आहे. वाहतूक पोलिसांकडून सर्वाधिक दंड ट्रिपल सीटसाठी करण्यात आला आहे.





## पाल्याकडे लक्ष द्या

अल्पवयीन मुलांनी वाहन चालविणे गुन्हा आहे. मोटार वाहन अधिनियम पाचअंतर्गत त्या मुलाच्या पालकांविरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला जातो. रस्ते अपघात कमी करण्यासाठी सर्वांनी वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करावे. पालकांनी अल्पवयीन मुलांच्या ताब्यात वाहन देऊन त्यांचा जीव धोक्यात घालू नये. - वाहतूक विभाग



CamScanner

लोकमत

# अपघातानंतरचा प्रवास ठाऊक आहे का; नंतर पश्चाताप करून काय उपयोग?

## दुचाकीस्वारांचे अपघात होतात अधिक; कोणी किरकोळ जखमी तर कोणी रक्तबंबाळ

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : अलीकडे अपघातांचे प्रमाण वाढले असून, याला भरधाव वेग, धोकादायक रस्ते, चालकांचा निष्काळजीपणा ही कारणे समोर येत आहेत. मनपा किंवा खासगी हॉस्पिटलच्या अपघात विभागामध्ये अपघातानंतरचे वास्तव समोर आले. दररोज एखादा अपघात असतोच. अपघातग्रस्तांना मनपा व खासगी हॉस्पिटलमध्ये आणले जाते. यामध्ये सर्वाधिक अपघात दुचाकीस्वारांचे होते. कोणाचा हात फ्रॅक्चर, तर कोणाचा पाय, खांदा निखळलेला होता. या अपघाताची माहिती कुटुंबीयांना मिळाल्यानंतर कुटुंबीय अस्वस्थ होतात. अपघातानंतर पश्चातापाची वेळ येऊ नये, यासाठी वाहनचालकांनी वाहन चालवताना खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे यातून दिसून आले.




### शासकीय, खासगी रुग्णालयांत रोज ३ ते ४ जणांवर उपचार

येथील मनपा व खासगी रुग्णालयात रोज ३ ते ४ अपघातग्रस्त रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. किरकोळ जखमी रुग्णांपासून ते गंभीर जखमी रुग्णांचाही समावेश आहे.

### तरुणांचे प्रमाण अधिक

रुग्णालयात १२ तासांत अपघात विभागामध्ये झालेल्या जखमींमध्ये बहुतांश तरुण होते. हे रुग्ण १८ ते ३५ वयोगटांतील आहेत. भरधाव वेग व निष्काळजीपणा अपघाताला कारणीभूत ठरत असल्याचे दिसून आले. हेल्मेट न घातल्याने वाहनचालकांचे जीव जाण्याचेही प्रमाण अधिक आहे.

### अपघाताची कारणे काय असतात?

अपघाताला सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे भरधाव वेगाने वाहन चालवणे. यामुळे अनेकदा चालकांचा वाहनावरील ताबा सुटून अपघात घडतात. याशिवाय धोकादायक वळण, रस्त्यावर पडलेले खड्डे हेही अपघाताला निमंत्रण देत असल्याचे अनेकदा दिसून येते. वाहन चालविण्याचे प्रशिक्षण न घेणारे चालकही अनेक आहेत. यामुळे अपघात होत आहेत.

### पोलिसांची काय भूमिका असते?

अपघातात जखमी रुग्ण दाखल झाल्यानंतर रुग्णालय परिसरातील स्थानिक पोलिस ठाण्यात एमएलसी पाठवतात. त्यानंतर अपघात कोठे, कोणत्या भागात झाला, याबाबत स्वत: जाऊन पोलिस माहिती घेतात. जखमी बोलण्याच्या स्थितीत असेल, तर त्याचे जबाब पोलिस नोंदवतात.

### 'लोकमत' प्रतिनिधीने काय पाहिले?

#### उपचारासाठी डॉक्टरांची धावपळ

१ रुग्णालयात अपघातामध्ये गंभीर जखमी व्यक्ती उपचारासाठी दाखल होताच त्या रुग्णाची तातडीने तपासणी करून योग्य उपचार, सेवा देण्यासाठी डॉक्टरांची धावपळ दिसून आली. गंभीर रुग्णाला योग्य उपचारासाठी इतर ठिकाणी रेफर करण्याची लगबग दिसून आली.

#### नातेवाईकांचा आक्रोश

२ रुग्णालयात जखमीला भरती केल्यानंतर त्या अपघातग्रस्ताची प्रकृती पाहण्यासाठी रुग्णालयात परिसरात नातेवाईकांची गर्दी होते. यावेळी नातेवाईकांचा आक्रोश, त्यांचा आकांत दिसून आला. तसेच रुग्णाला योग्य उपचार मिळावे, यासाठी डॉक्टरांची वारंवार भेट घेताना नातेवाईक दिसून आले.

"रुग्णालयात रोज दोन-चार तरी अपघातग्रस्त रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. यावेळी तज्ज्ञ डॉक्टर त्यांची पाहणी करून त्यांना योग्य उपचार पुरवले जातात. जर रुग्ण जास्त जखमी किंवा गंभीर असेल तर, त्याला योग्य उपचारासाठी तातडीने रेफर करण्याची प्रक्रिया केली जाते.

- मनपा प्रशासन

Hello Vasai
Page No. 4 Apr 05, 2023
Powered by: erelego.com

CamScanner